महाराष्ट्र लोकसेवा आयोग
Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्स:२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in

क्रमांक:-एमआयएस-०६१७/सीआर-५०/२०१७/तीन दिनांक १४ जून, २०१८

# घोषणा

**विषय:**-उमेदवारांनी बायोमेट्रीक माहिती अनलॉक करण्याबाबत

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित परीक्षांना बसणा-या उमेदवारांची ओळख पटविण्याकरीता उमेदवारांनी त्यांच्या ऑनलाईन अर्जप्रणालीच्या संकेतस्थळावरील खात्यात त्यांचे आधार कार्ड विषयक तपशील नोंदविण्याची पध्दत मार्च, २०१७ पासून लागू करण्यात आली आहे. ऑनलाईन अर्ज प्रणालीवरील खात्यामध्ये (प्रोफाईल) आधार तपशील नोंदविण्याची कार्यवाही न केल्यास प्रोफाईलद्वारे अर्ज सादर करण्याची सुविधा दिनांक १ जून, २०१८ पासून निष्क्रिय करण्यात येईल; असे दिनांक ४ मे, २०१८ रोजीच्या घोषणेद्वारे स्पष्ट करण्यात आले आहे.

**२.** उमेदवारांनी आधार क्रमांक त्यांच्या खात्यात नमूद केले असले तरी काही उमेदवारांनी भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (UIDAI) द्वारे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या लॉक / अनलॉक सुविधेद्वारा त्यांची आधार क्रमांकाशी संलग्नित बायोमेट्रीक माहिती लॉक केली असल्याने त्यांचे परीक्षेच्या वेळी आधार प्रमाणीकरण (Aadhaar Authentication) व पर्यायाने बायोमेट्रिक पडताळणी न होण्याची शक्यता आहे. परीक्षेच्या वेळी आधार क्रमांकाच्या आधारे बायोमेट्रिक पडताळणी करण्याकरीता उमेदवारांची आधार संलग्नित बायोमेट्रिक माहिती अनलॉक असणे आवश्यक आहे. यास्तव, आधार प्रमाणीकरणाकरीता बायोमेट्रिक माहिती लॉक केली असणा-या उमेदवारांनी परीक्षा / मुलाखत / शारिरीक चाचणीस उपस्थित राहण्यापूर्वी भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (UIDAI) च्या संकेतस्थळावरुन बायोमेट्रिक माहिती अनलॉक करुन प्रमाणीकरणाकरीता खुली करावी. अन्यथा संबधित परीक्षा / मुलाखत / शारीरिक चाचणीकरीता उमेदवाराला प्रवेश नाकारला जाऊ शकतो.

सुनिल अवताडे
उपसचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण:-मुंबई